CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

पुणें विद्यापीठ

ज्योतिःशास्त्रीय परिभाषा

मूल्य १५ नये पैसे

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

पुणें विद्यापीठ

मराठी परिभाषा सामोत

१. डॉ. बाळकृष्ण चिंतामण लागू, (अध्यक्ष)
२. प्रा. गोपाळ रामचंद्र परांजपे, (चिटणीस)
३. डॉ. मल्हार विनायक आपटे,
४. प्रा. कमलाकांत बामन केळकर,
५. श्री. चिंतामण गणेश कर्वे,
६. प्रा. गोविंद रामचंद्र केळकर,
७. डॉ. गजानन श्रीपाद खैर,
८. डॉ. दिगंबर काशिनाथ गर्दे,
९. प्रा. मोरेश्वर वासुदेव चिंपळोणकर,
१०. प्रा. मोहनीराज लक्ष्मण चंद्रात्रेय,
११. डॉ. माधव पुरुषोत्तम जोशी,
१२. प्रा. रामचंद्र नारायण जोशी,
१३. कै. त्र्यंबक गोविंद ढवळे,
१४. प्रा. प्रभाकर रामकृष्ण दामले,
१५. प्रा. त्र्यंबक शंकर महाबळे,
१६. आचार्य विष्णु प्रभाकर लिमये,
१७. प्रा. देवीदास दत्तात्रेय वाडेकर,
१८. प्रा. बाबुराव गणपतराव शिरोळे,
१९. प्रिं. नरहर गोविंद सुरु,
२०. प्रा. श्रीकृष्ण गोपाळ हुल्याळकर.

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

प्रास्ताविक निवेदन

'सर्व दर्जाच्या व सर्व शास्त्रांतील शिक्षणासाठीं मातृभाषा हेंच अत्यत स्वाभाविक आणि योग्य माध्यम असून त्या दृष्टीनें मराठी भाषेची वाढ झाली पाहिजे' अशी पुणें विद्यापीठाची भूमिका आहे. अध्यापन व कारभार यामध्यें मराठी भाषेचा वाढत्या प्रमाणांत वापर करण्याच्या दृष्टीनें विद्यापीठानें कांहीं प्राथमिक गोष्टी केल्या आहेत. १९५३ सालीं विद्यापीठानें **भारतीय भाषाविकास परिषद** घडवून आणिली. त्यानंतर १९५८ सालीं **मराठी परिभाषा समिति** नियुक्त करण्यांत आली.

भारतीय भाषाविकास परिषदेनें केलेल्या शिफारसी मूलभूत पाया म्हणून मानण्यासारख्या आहेत. त्या अशा :—

शास्त्रीय परिभाषा शक्य तर संस्कृतोद्भव असावी. आंतर्राष्ट्रीय स्वरूपांची चिन्हें, संज्ञा, प्रतीकें त्याच स्वरूपांत ठेवावींत. विचार व क्रिया-प्रक्रिया दर्शविणाऱ्या परभाषेंतील पारिभाषिक शब्दरूपकांना भारतीय भाषेंत सोईस्कर वळण देणें सहजसाध्य नसेल तर रूढ असलेली आंतर्राष्ट्रीय शब्दयोजनाच कायम ठेवावी. मान्य परिभाषा इतर भाषांतील परिभाषेशीं शक्य तेवढी मिळतीजुळती असावी.

सध्या जरी बहुतेक विषयांतील शिक्षण इंग्रजींतून चालत असलें तरी लवकरच मराठीचा पूर्णपणें वापर करणें आवश्यक होईल अशी पुणें विद्यापीठाची धारणा आहे, आणि हें सुलभ व्हावें याकरितां अवश्य तेवढी शास्त्रीय परिभाषा निश्चित करून शास्त्रीय विषयावरील ग्रंथनिर्मितीस पूरक असें कार्य आज विद्यापीठ करीत आहे.

मराठी परिभाषा समितीनें ज्ञानाच्या विविध शास्त्रांतील परिभाषा निश्चित करण्यासाठीं कांहीं उपसमित्या नियुक्त केल्या असून त्यांचें काम प्रगत होत आहे. गेल्या शंभर दीडशें वर्षांत मराठी लेखनांत जे जे पारिभाषिक शब्द वापरले गेले त्यांचे शाखावार स्वतंत्र **शब्दसंग्रह** परिभाषासमितीनें प्रथमतः तयार करवून घेतले. इतकें झाल्यावर या शब्दसंग्रहांतून योग्य पारिभाषिक शब्दांची निवड करण्याची अगर जरूर तेथें नवीन शब्द तयार करण्याची कामगिरी उपसमितीमधील तज्ज्ञांवर सोपविण्यांत येते. उपसमितीचें हें काम संपल्यानंतर भिन्न भिन्न ज्ञानशाखांतील तज्ज्ञ एकत्रित जमून पारिभाषिक शब्दांचें सूक्ष्म परीक्षण करतात. अशावेळीं

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

संस्कृत भाषा उत्कृष्ट रीतीनें जाणणाऱ्या सदस्यांचें साहाय्य घेण्यांत येतें. अखेरीस एकेका ज्ञान शाखेंतील पारिभाषिक शब्दांच्या यादीस परिभाषा समितीची मान्यता देण्यांत येते.

आजपर्यंत गणितशास्त्र, ज्योतिःशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र या विषयांतील पारिभाषिक शब्दांच्या याद्या तयार झाल्या असून वनस्पतिशास्त्र आणि प्राणिशास्त्र यांतील याद्या पूर्ण होत आल्या आहेत.

यांपैकीं गणितशास्त्रांतील पारिभाषिक शब्दांची यादी यापूर्वीच प्रसिद्ध झाली आहे. आतां **ज्योतिःशास्त्रांतील** पारिभाषिक शब्दांचा सांगोपांग विचार करून परिभाषासमितीनें ती निश्चित केल्यानंतर **पुणें विद्यापीठानें त्या यादीस मान्यता दिली आहे** व ती यादी आज प्रसिद्ध करण्यांत येत आहे. महाविद्यालयांतील पदवीपरीक्षेपर्यंत अवश्य अशा पुढील परिभाषेची तयारी चालू आहे.

संबंधित लेखक, प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी इत्यादींनीं या मान्य परिभाषेचा वापर करून तिला रूढ करण्याचा पद्धतशीर प्रयत्न करावा अशी विद्यापीठाची शिफारस आहे.

या परिभाषेसंबंधीं कांहीं सुधारणा वगैरे विद्यापीठाकडे धाडण्यांत आल्या तर त्यांचा अवश्य तेवढा परामर्श घेण्यांत येईल.

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

ज्योतिःशास्त्र (Astronomy)

A

aberration (of lenses & mirrors) विचलन
—, chromatic वर्गीय विचलन
—, constant of प्रच्यवनांक
— of light प्रच्यवन
—, spherical गोलीय विचलन
achromatic निर्वर्ण
albedo प्रतिक्षेप
altitude उन्नतांश
angular कोनीय
— diameter कोनव्यास
— distance वलितांतर
— motion कोनगति, कोनीयगति.
annular eclipse कंकणग्रहण
anomalistic उप(...)क, उदा. उप (सूर्य) क
apex of the sun's way सौरगंतव्य
aphelion अपसूर्य
apogee अपभू
apparent magnitude दृश्य प्रत; भासमान प्रत्यंक
apse उच्च
– line उच्चांतर
– point उच्चाबिंदु
asteroid लघुग्रह
astronomical unit ज्योतिःशास्त्रीय एकक, भू-सू (भू=पृथ्वी, सू=सूर्य)
astronomer ज्योतिर्विद
astronomy ज्योतिःशास्त्र
astrologer फलज्योतिषी
astrology फलज्योतिष
astro-physics ज्योतिर्वास्तव
aurora उद्योत
— australis दक्षिण उद्योत
— borealis उत्तर उद्योत
azimuth क्षित्यंश, दिगंश

B

binary stars द्वैती तारे
black body radiation कृष्णकीय प्रारण
brightness चकाकी, चकासन

C

cardinal point प्रदिष्ट, दिग्बिंदु
celestial sphere खगोल, भगोल
— body ज्योति
— north pole भगोलीय उत्तर ध्रुवक
— south pole भगोलीय दक्षिण ध्रुवक
Cepheid (variable star) सेफाईड (रूपविकारी तारा)
chronograph वेलालेख
chronometer वेलामापक
circum-polar परिध्रुव; परिध्रुवक
civil year सावन वर्ष
cluster कलाप
comet धूमकेतु, दुँडे नक्षत्र

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

conjunction योग, निभांतर
—, inferior आंतर—
—, superior बाह्य—
constellation तारा संस्थान
corona किरीट
cosmic dust वैश्व रज
— rays वैश्व किरण
cosmogony विश्वोत्पत्तिशास्त्र
cosmology विश्वस्थितिशास्त्र
crater विवर
cycle पर्यय

D

date तारीख, दिनांक
date-line दिन रेषा
day दिवस = २४ तास; दिन = सूर्य उदयापासून सूर्य अस्तापर्यंतचा अवधि
— of the week वार
declination क्रांति
diffraction grating विवर्तजालक
disc बिंब
dispersion विकिरण
Döppler effect डॉप्लर परिणाम, धावत् परिणाम
dwarf star खुजा तारा

E

earth पृथ्वी
eclipse ग्रहण
—, annular कंकणग्रहण
—, partial खंडग्रहण
—, total खग्रासग्रहण
— year ग्रहणवर्ष
eclipsing binary पिधायक द्वैती
ecliptic आयनिक (वृत्त)
—, polar axis of the कदंब
—, pole of the आयनिक ध्रुवक, मेरू
elongation अपगम
—, eastern पूर्व-अपगम
—, western पश्चिम-अपगम
enhanced line प्रवृद्ध रेषा
equation of time कालसंस्कार
equator, celestial वैषुविक
—, geographical विषुव
equinox संपात
—, autumnal शरत्संपात
—, vernal वसंतसंपात
equinoxial year सांपातिक वर्ष, आर्तव वर्ष
extra-galactic बहिर्दीर्घिक
eye-piece (lens) नेत्रीय (भिंग)

F

faculae ज्वालमाला
first point of Aries वसंत-संपात, मेषारंभ
flare, solar उज्ज्वाला
flocculi ज्वालकसंघात

G

galaxy दीर्घिका
gegenschein विपथप्रकाश
geocentric भूनिष्ठ
giant star राक्षसी तारा

H

heliocentric सूर्यनिष्ठ
horizon क्षितिज, दिङ्मंडल
—, artificial कृत्रिम—
—, astronomical ज्योतिष्कीय—
—, sensible दृश्य—

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

horizon, visible दृश्य क्षितिज
hour तास
—angle कालकोण

I

intercalary day अधिदिवस
intercalary month अधिक मास
interference व्यतिकरण
inter-stellar space तारकांतरीय अवकाश

J

Jupiter गुरु

L

latitude, celestial शर
–, terrestrial अक्षांश
libration(of the moon)(चंद्र)दोलना
light curve चकासनआलेख
light-gathering power प्रकाश-चयन
light year प्रकाशवर्ष (प्रकाशवेगानें वर्षांत तोडलेलें अंतर)
limb कड
linear distance चलितांतर
leap year प्रवर्ष
luminosity दीप्ति
lunar चांद्र
—day तिथि
—mansion नक्षत्र
—month चांद्रमास
luni-solar चांद्र–सौर

M

Magellanic cloud मागेलानी मेघ
magnification वर्धन
magnitude प्रत
–, absolute केवल–, निरपेक्ष–
–, apparent दृश्य— भासमान –
Mars मंगळ
Mercury बुध
meridian (prime) मध्यमंडल
meteor उल्का
meteorite अशनि
milky way आकाशगंगा
minute मिनिट

N

nadir अधःस्वस्तिक
neap tide अवोद्धान, ओहोटी
nebula अभ्रिका
Neptune नेपच्यून
night रात्र
node पात
—, ascending (of moon's orbit) राहू
—, ascending (of any orbit) अधिपात
—, descending (of moon's orbit) केतु
—, descending (of any orbit) अवपात
nova नवतारा
nutation अपेंगन

O

objective (lens) पदार्थीय (भिंग)
occultation पिधान
opposition षडभांतर, प्रतियोग
orbit कक्षा

P

parallax पराशय
–, horizontal पराशर

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

parsec पार्सेक (दूरता–एकक)
penumbra उपच्छाया
perigee उपभू
perihelion उपसूर्य
period पर्ययकाल
perturbation विक्षोभ
phase कला
photosphere दीप्तगोल
planet ग्रह
—, inner आंतर–
—, major गुर्वादि–
—, outer बाह्य–
—, terrestrial भौम–, पृथिव्यादि–
planetarium परिभादर्श
planetary nebula ग्रहानुकारी अभ्रिका
Pluto प्लूटो
pole and polar axis ध्रुव (ध्रुवक) आणि विष्कंभ
precession परांचन
prime vertical सममंडल
proper motion निजगति

Q

quadrature त्रिभांतर

R

radial motion अरागति
radiant point (of meteors) (उल्कांचा) उद्गमबिंदु
reflector (telescope) परावर्ती (दुर्बीण), आरशाची दुर्बीण
refractor (telescope) प्रणामी, (दुर्बीण), भिंगाची दुर्बीण
resolution (optical) विभक्ति (प्रकाशीय)
retrograde motion वक्रीगमन
reversing layer विपर्ययी आवरण
revolution परिभ्रमण
right ascension वैषुवांश, होरा
ring कडें, (शनीचें) वलय
rotation परिवलन; वलन

S

Saros (cycle) सारोस (चक्र)
satellite उपग्रह
Saturn शनि
second सेकंद
shift उपसर
—, blue नील–
—, red ताम्र–
shooting star उल्का
siderial नाक्षत्र
slit भिदा, भेग
solar सौर
— constant सौरांक
— family सूर्यकुल
— prominence सौर उद्रेक
— system सूर्यकुल
solstice संस्तंभ
—, summer विष्टंभ
—, winter अवष्टंभ
spectral class वर्णावलिवर्ग
spectrometer वर्णरेषामापक
spectroscope वर्णादर्श
spectrum वर्णालेख
—, band पट्ट–
—, line रेषा–
spiral nebula वलिताभ्रिका; वलित दीर्घिका
spring tide प्रोद्धान, भरती
standard time प्रमाणकाल, आप्तकाल
star तारा

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

star, binary द्वैती तारा
—, cluster—कलाप
—, dwarf खुजा—
—, giant राक्षसी—
—, globular cluster गोलककलाप; गुच्छ (तारांचा)
— group तारकासंघ
—, main sequence मालिकी
—, trinary त्रैती—
—, variable रूपविकारी—
stationary (planet in motion) स्तब्ध, स्तंभी
summer solstice विष्टंभ
sun-dial छायायंत्र
sun-spot सूर्यकलंक, सूर्यावरील डाग
super-nova अतिनव तारा
synodic सांवासिक

T

telescope दुर्बीण
—, radio संवह—
—, reflecting परावर्ती—
—, refracting द्रणामी—
tide उद्धान, उधाण
—, direct अपरोद्धान
—, high प्रोद्धान
—, neap अवोद्धान
—, opposite परोद्धान
—, spring प्रोद्धान
time काल
—, Greenwich ग्रीनिच काल
—, local स्थानिक काल
transit (across meridian) उल्लंघन
transit (across sun) अधिक्रमण
triangulation त्रिकोणीकरण
tropical year सांपातिक (आर्तव) वर्ष

U

umbra छाया
Uranus युरेनस

V

variable star रूपविकारी तारा
Venus शुक्र
vernal equinox वसंतसंपात

W

winter solstice अवष्टंभ

Y

year वर्ष
—, anomalistic उच्चांतर—
—, civil सावन—
—, equinoxial आर्तव—
—, moon चांद्र—
—, synodic सांवासिक—
—, tropical सांपातिक—

Z

zenith खस्वस्तिक
zenith distance नतांश
zodiac ग्रहपथ
zodiacal light पथप्रकाश

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

Devavani Parishad New Delhi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri/Sarayu Trust

◆ प्रकाशक :

व. ह. गोळे,
कार्यवाह,
पुणें विद्यापीठ,
पुणें ७.

प्रथमावृत्ति
ऑगस्ट
१९६०

◆ मुद्रक :

म. ना. चापेकर,
आर्यसंस्कृति
मुद्रणालय,
पुणें २.

Devavani Parishad New Delhi